**मार्गदर्शक सूचना**

जा.क्र.शेमासे/कृषिदिन/२९१ /१४
कृषि आयुक्ताल, महाराष्ट्र राज्य, पुणे-५
दिनांक - १० जून २०१४

**प्रती,**

**विभागीय कृषि सहसंचालक** (सर्व)------------
**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी** (सर्व)---------------
**कृषि विकास अधिकारी** (जिल्हा परिषद) (सर्व)-----------------

**विषय - महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांची जयंती राज्यात दि. १ जुलै २०१४ कृषिदिन म्हणून साजरी करणेबाबत .....**

संदर्भ - शासन निर्णय क्रमांक कृषिदि-३४१३/प्र.क्र.१२७/३अे, मंत्रालय, मुंबई-३२, दि. १९ मे २०१४

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयान्वये दि. १ जुलै २०१४ रोजी राज्यात प्रती वर्षीप्रमाणे कृषि दिन साजरा करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. संदर्भिय शासन निर्णयात नमूद केल्यानुसार विषयांकीत प्रकरणी मार्गदर्शक सूचना खालील प्रमाणे देण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांनी कृषि क्षेत्रात केलेल्याभरीव योगदानाबद्दल १ जुलै हा त्यांचा जन्मदिवस कृषिदिन म्हणून राज्यात सर्वत्र साजरा करण्यात येतो. चालू वर्षी सुध्दा कृषिदिन साजरा करण्याबाबत संदर्भामधील शासन निर्णय निर्गमित झाला आहे. त्यानुसार विभागीय/जिल्हा/तालुका स्तरावर तसेच कृषि विभागाच्या इतर सर्व कार्यालयांमध्ये प्रथमतः स्वर्गीय वसंतराव नाईक यांचे प्रतिमेला हार घालून पुजन करून कृषिदिन साजरा करावयाचा असून त्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

कृषिदिन साजरा करताना जिल्हा स्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, प्रकल्प संचालक (आत्मा) व कृषि विकास अधिकारी यांनी जिल्हा परिषद कार्यालयामध्ये कार्यक्रमाचे आयोजन करावे. तसेच तालुका स्तरावर संबंधित तालुका कृषि अधिकारी, गट विकास अधिकारी यांनी पंचायत समिती मुख्यालयांमध्ये कार्यक्रमाचे आयोजन करावे.

**जिल्हास्तर** – विभागीय कृषि सह संचालक यांनी त्यांच्या अधिनस्त असलेले जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, कृषि विकास अधिकारी यांचेशी विचार विनिमय करून विभागातील सर्व जिल्ह्यांच्या कार्यक्रमांचे नियोजन करून कार्यक्रम यशस्वीपणे पार पडेल याची दक्षता घ्यावी.

कृषिदिनाच्या निमित्ताने जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, प्रकल्प संचालक (आत्मा) आणि कृषि विकास अधिकारी यांनी पुढाकार घेऊन मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करावे. त्यासाठी पालकमंत्री, जिल्ह्यातील सन्माननीय लोक प्रतिनिधी, जिल्हास्तरीय अधिकारी, आत्मातंर्गत शेतकरी सल्लागार समितीचे जिल्हास्तरीय सदस्य, प्रगतीशील शेतकरी यांना निमंत्रीत करावे. कार्यक्रमामध्ये कृषि शास्त्रज्ञ, पुरस्कार प्राप्त शेतकरी यांची मार्गदर्शनपर व्याख्याने आयोजित करावीत. या कार्यक्रमात कृषि व कृषि संलग्न क्षेत्रात उल्लेखनिय काम केलेल्या शेतकरी, व्यक्ती, संस्था, अधिकारी

व कर्मचारी यांना सन्मानित करण्यात यावे. तसेच जिल्हास्तरीय कृषि प्रदर्शन, कृषिविषयक निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा यांचे आयोजन करण्यात यावे. १ जुलै २०१४ रोजी कै. वसंतरावजी नाईक यांच्या कृषि क्षेत्रातील योगदानाबाबत स्थानिक वृत्तपत्रांमध्ये माहितीपर लेख प्रसिध्द करावेत.

**तालुकास्तर-** तालुका स्तरावरील कार्यक्रमाचे नियोजन करून व्यवस्थितरित्या कृषिदिन साजरा होईल यांची दक्षता उपविभागीय कृषि अधिकारी यांनी घ्यावी. त्यासाठी उपविभागीय कृषि अधिकारी यांनी आपल्या अधिनस्त सर्वच तालुक्याच्या ठिकाणी तालुका कृषि अधिकारी, गट विकास अधिकारी पंचायत समिती यांचे मदतीने व समन्वयाने कार्यक्रमांचे नियोजन करावे. सदर कार्यक्रमाचे आयोजन पंचायत समितीच्या मुख्यालयात करावे.

सदर कार्यक्रमास तालुका स्तरावरील सन्माननीय लोक प्रतिनिधी, प्रगतीशील शेतकरी, तालुकास्तरीय इतर अधिकारी, आत्मातंर्गत स्थापन झालेल्या शेतकरी सल्लागार समितीचे तालुकास्तरीय सदस्य यांना निमंत्रीत करावे. कार्यक्रमानिमित्त कृषि शास्त्रज्ञ, तालुक्यातील पुरस्कार प्राप्त पुरूष व महिला शेतकरी यांची मार्गदर्शनपर व्याख्याने आयोजीत करावीत. कृषि माहिती विषयक चित्रफिती, प्रदर्शन, स्पर्धा आणि क्षेत्रीय भेटीचे आयोजन करावे. या निमित्ताने कृषि विषयक नाविन्यपूर्ण कार्यक्रम उदा. तंत्रज्ञान प्रात्यक्षिके, वृक्ष लागवड कार्यक्रम, बांधावरील खत वाटप, बीज प्रक्रिया, मूलस्थानी जलसंधारणाची कामे, जलपुजन इ. कार्यक्रमांचा शुभारंभ करावा.

**खर्चाचा तपशील** – कृषिदिन कार्यक्रमाच्या आयोजनासाठी शेतक-यांकरिता चहापाणी, मंडप, हारतुरे, फोटो, फ्लेक्स, प्रदर्शन इ. बाबींवर होणा-या खर्चासाठी निधीची आवश्यकता असते. तालुकास्तरावर प्रत्येक पंचायत समिती करीता रू. १५००/- तसेच जिल्हा परिषद मुख्यालयी कृषिदिन साजरा करणेसाठी प्रती जिल्हा परिषद रूपये २०००/- याप्रमाणे खर्च करण्यात यावा. तसेच कृषि विषयक चित्रफिती दाखविणे, शेतक-यांसाठी चहापाणी, जिल्हा परिषद स्तरावर छोटेसे प्रदर्शन, मंडप, हारतूरे, फोटो वगैरे आवश्यक बाबीकरीता खर्च करावा.

या प्रित्यर्थ येणारा खर्च जिल्हा परिषद सेस फंडातील उपलब्ध असलेल्या अनुदानातून करण्यात यावा. हा खर्च भागविण्याकरिता सर्व जिल्हयातील मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व कृषि विकास अधिकारी यांनी जिल्हा सेस फंडातून खर्च करण्याकरिता या मार्गदर्शक सूचनेनूसार कार्यवाही करावी. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयुक्तालयास त्वरीत सादर करावा.

स्वाक्षरीत/-
**कृषि संचालक (विप्र)**
कृषि आयुक्ताल, महाराष्ट्र राज्य, पुणे-५

**प्रत-** १) मा. अपर मुख्य सचिव (कृषि व पणन) मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीस्तव सविनय सादर
२) कक्ष अधिकारी ३ अे, महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई -३२ यांना माहितीस्तव अग्रेषित.
३) मा. आयुक्त कृषि, कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५ यांना माहितीस्तव सविनय सादर
४) पालक संचालक (सर्व) कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे- यांना माहितीस्तव तथा योग्य कार्यवाहीसाठी अग्रेषित.